**फळशास्त्र विभाग, उद्यानविद्या विद्याशाखा**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा क्र./वि.प्र/फ.शा./प्रक्षेत्र /दरपत्रक२२३/२०२३ दि.२२/०६/२०२३

## दर पत्रक

प्रती,

..........................................................

..........................................................

..........................................................

**विषय: प्रक्षेत्रावर व रोपवाटिकेत दैनंदिन कामे अकुशल मजुराच्या मार्फत कंत्राटी पद्धतीने करणेबाबत....**

वरील विषयाच्या अनुषंगाने सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून (अटी व शर्तीचे मान्य असल्या बाबतचे प्रमाणपत्रासह) प्रक्षेत्रावरव रोपवाटिकेत विविध कामे अकुशल मजुराच्या मार्फत कंत्राटी पद्धतीने करण्याकरिताचे दर खाली दिलेल्या प्रपत्रा मध्ये भरून विहीत मुदतीच्या आत या कार्यालयास सादर करावेत.

### दर सादर करावयाचे प्रपत्र

| Sr. No. | Description | Unskilled contractual labour (Rs.) |
|---|---|---|
| 1 | Basic Wages | |
| 2 | Variable DearnessAllowance | |
| | **TotalMinimumWages** | |
| 3 | EPF13% | |
| 4 | ESIS 4% | |
| 5 | ServiceChargesforCompany/ FirmCharges | |
| 6 | TotalRs. | |
| 7 | GST18% (If applicable) | |
| 8 | TotalwithGST | |
| 9 | **Rate per month per unit for Unskilled labour** | |

* वरील प्रपत्रात अकुशल मजुराचे दर हे किमान वेतन कायद्यानुसार सादर करावेत. या पेक्षा कमी दर ग्राह्य धरण्यात येणार नाही.

टिप: सर्व दरपत्रके दि.३/०७/२०२३ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत.

सर्व दर पत्रके हे **विभाग प्रमुख, फळशास्त्र विभाग,डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला** यांच्या नावे खालील कार्यालयीन पत्त्यावर पोहचविण्याचे करावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

Scanned with CamScanner

<u>दर पत्रका विषयी नियम व अटी शर्ती</u>

१. कंत्राटी मजूर पुरविण्याच्या अध्ययावत परवान्याची सत्यप्रत.

२ .संस्था /कंपनी ,कंत्राटदाराच्याआस्थापनेचे पन कार्ड व दर पत्रकावर स्वाक्षरी करणाऱ्याचे आधारकार्ड ची छायांकित प्रत.

३. कमीत कमी तीन वर्षाचा विद्यापिठात अथवा शासकीय संस्था/ निमशासकीय कार्यालय यांना कंत्राटी मजूर पुरविल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत तसेच संबंधीत कार्यालयात कामसमाधानकारकपूर्ण केल्याच्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत. कार्यालयाच्या कार्यालय प्रमुख/ संबंधित व्यक्तीचे पूर्ण नाव व संपर्क क्रमांक.

४. कोणत्याही शासकीय, निमशासकीय/ महामंडळाच्या काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे स्वयंघोषीत प्रमाणपत्र सादर करावे.

५. भविष्य निर्वाह निधी EPF नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

६ .व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

७. ई. एस. आय. एस. (Employees State Insurance Scheme) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत

८. जी. एस. टी. नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत

९. दरपत्रक समितीने निश्चित केलेल्या नियम व अटी मान्य असल्याचे प्रमाणपत्र सदर करावे.

१०. कंत्राटदाराने कंत्राटी मजुराचे मासिक दर नमूद करतांना Basic Wages + Variable Dearness Allowance यांच्या एकूण रकमेवर त्याला आकारावयाच्या त्याच्या कमिशन गणना करणे अपेक्षित आहे. सारखे दर आल्यास संबंधिताना वाटाघाटीकरिता बोलावून त्याचा अनुभव व वार्षिक उलाढाल ई. बाबी विचारात घेऊन अंतिम निर्णय समितीचा असेल.

११. कंत्राटदाराने कंत्राटी मजुराचे वेतन रोखीने अदा न करता Account payee crossCheque द्वारे अदा करणे किवा बँकेत खाते उघडून त्याचे मासिक वेतन त्याच्या बँक खात्यात पाच तारखेच्या आत जमा करणे बंधनकारक राहील.

१२. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील इतर तरतुदी पेक्षा कमी रक्कम नमूद करू नये थोडक्यात कृषि विद्यापीठ यांच्यासाठी निर्धारित केलेले किमान वेतन संबंधित कामगारास देणे बंधनकारक राहील.

१३. ज्या कंत्राटी मजुराचा भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक कार्यान्वित नसेल त्यांना कामावर ठेवू नये तसेच नवीन मजूर कामावर घ्यावयाचे असल्यास त्याचा भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक कार्यान्वित करून घेणे बंधनकारक राहील.

१४. बाल मजूर कायद्याचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१५. पी. एफ., विमा योजना, बोनस, ग्रज्युएटी, कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार ई. देयक वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय वेतन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील या बाबतीत काही वाद निर्माण झाल्यास विभागप्रमुख/ विद्यापीठ प्रशासन हस्तक्षेप करणार नाही अथवा कोणतीही जबाबदारी कार्यालयाची/ विद्यापीठाची राहणार नाही.

१६. कंत्राटदाराने कामगारास दरमहा अदा केलेल्या भविष्य निर्वाह निधी, गटविमा पावती व वेतन चिठ्ठी दरमाह संबंधीत कार्यालयास देणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास त्याचे पुढील महिन्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१७.कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवष्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरीनोंद, वेतनवाटप नोंद, दैनंदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंद वहया ठेवणे व ते संबंधीत अधिका—याकडून तपासून घेणे बंधनकारक राहील व त्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

१८. महाविद्यालय/कार्यालयाचे कामकाज सुट्टीच्या दिवषीही चालत असल्याने वेळोवेळी कंत्राटी मजूरांना सुट्टी देणे, कमी जास्त प्रमाणात कंत्राटी मजूर पूरवठा करणे व प्रत्येक कंत्राटी मजूरांना साप्ताहिक सुटी देणे बंधनकारक राहील.

१९.शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमांची पूर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधीची कुठलीही जबाबदारी महाविद्यालय/कार्यालयाचे राहणार नाही.

२०.प्रत्येक कंत्राटी मजूरांना कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असून कामाच्या दिवषी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

२१.कंत्राटी मजूरास काम करतेवेळी इजा, अपघात अथवा मृत्यु संभविल्यास किंवा नैसर्गीक आपत्ती उदा. विज, पाउस, भूकंप, मषीनरी अपघात, <u>प्राणी/साप</u> आणि वादळामुळे इजा अपघात मृत्यु संभविल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेषिर जबाबदारी कंत्राटदाराची राहील यांचा महाविद्यालय/कार्यालया षी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

Scanned with CamScanner

२२. कंत्राटी पध्दतीने मजूर पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रॅक्टर / कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास संबंधीतांचा करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यानंतर महाविद्यालयाच्या तसेच कोणत्याही विद्यापीठाच्या दरपत्रक प्रकियेत संबंधित ठेकेदारास भाग घेता येणार नाही. उपरोक्त कारणामुळे काही कायदेशिर बाबी उत्पन्न झाल्यास त्याचा विद्यापीठाषी काहीही संबंध राहणार नसून त्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील.

२३. कंत्राटी मजुराने काम समाधानकारकरित्या न केल्यास त्याला त्या दिवशी परत पाठविण्यात येईल व कंत्राटदारास त्या दिवसाचे त्या कंत्राटी मजुराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

२५. कामात कचुराई व हलगर्जीपणामुळे महाविद्यालय / कार्यालयाचे नुकसान झाल्यास, दंडासह भरपाई करावी लागेल.

२६. कोणतीही दरपत्रक पूर्णपणे किंवा अंषतः स्विकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रक नाकारणे तसेच कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार समिती राखून ठेवला आहे. आवश्यकतेनुसार एकावेळी एक महिना असे जास्तीत जास्त तीन वेळा सहमतीने कंत्राटाचा कालावधी वाढवता येईल.

२७. शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय करसंबंधीत दरपत्रक धारकाने भरणे बंधनकारक राहील. दरपत्रक मधील दर सर्व कर समाविष्ट करून द्यावेत.

२८. करासचे संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यासंदर्भात अंतीम निर्णय विद्यापीठाचा राहील.

२९. उपरोक्त अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणारे ठेकेदार दरपत्रक प्रकियामध्ये भाग घेण्यास अधिकृत ठरतील.

३०. कंत्राटदाराने नियम व अटी काळजीपुर्वक वाचून या अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रपत्र दरपत्रक सादरकर्त्यास सादर करतेवेळी जोडणे बंधनकारक राहील.

३१. सदर दरपत्रक प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास अधिकारक्षेत्र अकोला जिल्हा न्यायालय हे राहील.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला

Scanned with CamScanner